**ठळक बातम्या**

- मुंबईला जागतिक आर्थिक केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी एमएमआरडीए आणि वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम यांच्यात सामंजस्य करार

- मुंबईत वरळी वांद्रे सी लिंक ला मरीन ड्राईव्ह कडून येणारा रस्ता जोडणाऱ्या किनारी मार्ग प्रकल्पातल्या टप्प्याचं मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण

- मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे महासचिव सीताराम येचुरी यांचं निधन

- रायगड जिल्ह्यात धाटाव इथं रासायनिक कंपनीमध्ये झालेल्या स्फोटात ३ कामगारांचा मृत्यू

**आणि**

- मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स १ हजार ४३९ अंकांची वाढ नोंदवत विक्रमी उंचीवर, राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीनंही गाठली नवी पातळी

**<><><><><>**

एमएमआरडीए अर्थात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम यांच्यात आज सामंजस्य करार झाला. ‘मुंबई महानगर क्षेत्रः जागतिक आर्थिक केंद्र म्हणून विकास’ या निती आयोगाच्या अहवालाचं मुंबईत प्रकाशन झालं. त्यावेळी हा करार झाला. मुंबईतल्या

सह्याद्री अतिथीगृहात झालेल्या या कार्यक्रमाला वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमचे संस्थापक आणि कार्यकारी अध्यक्ष क्लॉस श्वाब प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. उद्योग मंत्री उदय सामंत, शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, सार्वजनिक मंत्री रविंद्र चव्हाण, गृहनिर्माण मंत्री अतुल सावे, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

मुंबईत वरळी वांद्रे सी लिंक ला मरीन ड्राईव्ह कडून येणारा रस्ता जोडणाऱ्या किनारी मार्ग प्रकल्पातल्या टप्प्याचं लोकार्पण आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झालं. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस तसंच मंत्री दीपक केसरकर आणि मंगलप्रभात लोढा यावेळी उपस्थित होते.

या सागरी किनारा मार्गामुळे मरीन ड्राईव्ह ते वांद्रे हा पाऊण तासाचा रस्ता केवळ १० मिनिटात पार करता येईल असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी म्हणाले….

**होल्ड - बाईट -मुख्यमंत्री**

किनारी मार्गाच्या बांधकामाचा अडथळा मच्छिमारीत येऊ नये याकरता रचनेत बदल केला असल्याचं त्यांनी सांगितलं. सागरी किनारा मार्ग पुढे पालघरपर्यंत जाणार असून वाढवण बंदराकरता त्याचा उपयोग होणार आहे, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

हाय अल्टिट्युड अँटी सबमरिन वॉरफेअर हे पाणबुडीरोधक युद्ध तंत्रज्ञान अमेरिका भारताला विकणार आहे. ५ कोटी २८ लाख रूपये किमतीचं हे तंत्रज्ञान असून त्यामुळे भारताला एमएच ६० आर या हेलिकॉप्टरमधून पाणबुड्यांवर मारा करता येईल. या प्रस्तावित व्यवहारामुळे भारत आणि अमेरिकेतल्या द्वीपक्षीय संबंधांना नवे आयाम मिळणार असल्याचं अमेरिकेच्या संरक्षण विभागानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

गडचिरोली जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष यांनी आज अहेरी इथं राष्ट्रवादी काँग्रेस शरद्चंद्र पवार पक्षात प्रवेश केला. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, आणि माजी गृहमंत्री अनिल देशमुख यावेळी उपस्थित होते. भाग्यश्री आत्राम या अजीत पवार यांच्या नेतृत्वाखालच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि राज्याचे मंत्री धर्मरावबाबा आत्राम यांच्या कन्या आहेत.

**<><><><><>**

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केलेल्या संविधानविषयक वक्तव्याविरोधात भाजपाच्या अनुसूचित जाती मोर्चानं आज नागपूरच्या संविधान चौकात आंदोलन केलं. यावेळी राहुल गांधी यांच्या प्रतीकात्मक पुतळ्याचं दहन करण्यात आलं.

राहुल गांधी यांच्या विरोधात भाजपा उद्या राज्यभर आंदोलन करणार असल्याचं भाजपाच्या माध्यम विभागानं कळवलं आहे.

**<><><><><>**

श्रोते हो, विविध देशात गणेशोत्सव कशा रीतीनं साजरा होतो हे आपण तिथे राहणाऱ्या नागरिकांकडून जाणून घेत आहोत, आकाशवाणी मुंबईवरून रात्री ८ वाजून ५ मिनिटांनी प्रसारित होणाऱ्या राष्ट्रीय बातम्यांमध्ये. आज आपण जाणून घेणार आहोत, ऑस्ट्रेलियातल्या गणेशोत्सवाविषयी.

**<><><><><>**

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे महासचिव सीताराम येचुरी यांचं आज नवी दिल्लीत दीर्घ आजारानं निधन झालं. ते ७२ वर्षांचे होते. श्वासलिकेत संसर्ग झाल्यामुळे मागच्या काही दिवसांपासून त्यांच्यावर एम्समध्ये उपचार सुरू होते. मागच्या पाच दिवसांपासून त्यांना जीवरक्षण प्रणालीवर ठेवण्यात आलं होतं. आज दुपारी तीन वाजता त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

येचुरी यांचं पार्थिव मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या दिल्लीतल्या मुख्यालयात शनिवारी सकाळी अकरा ते दुपारी तीन वाजेपर्यंत अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे. त्यानंतर येचुरी यांचा देह रुग्णालयाला दान केला जाणार आहे.

*(सीताराम येचुरी हे गेल्या पाच दशकांपासून राजकारणात सक्रीय होते. दिल्लीतल्या जवाहरलाल नेहरू विद्यापीठात उच्चशिक्षण घेत असताना ते स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया या माकप प्रणित विद्यार्थी संघटनेशी जोडले गेले.त्यानंतर त्यांनी जेएनयू विद्यार्थी संसदेच्या अध्यक्षपदी निवडून आले होते. आणीबाणीला विरोध केल्यामुळे येचुरी यांना तुरुंगवासही भोगावा लागला होता. त्यानंतर ते मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षात सामील झाले. सलग बारा वर्षे त्यांनी राज्यसभेत पक्षाचं प्रतिनिधित्व केलं. २०१५ पासून ते मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे महासचिव म्हणून कार्यरत होते. डाव्या पक्षांमध्ये समन्वय साधणारे तसंच इतर पक्षांमधल्या नेत्यांशी संवाद असणारे नेते म्हणून येचुरी यांची ओळख होती. सर्वपक्षीय नेत्यांना येचुरी यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे.)*

**<><><><><>**

***सीताराम*** **येचुरी** यांच्या निधनाबद्दल अनेक राजकीय नेत्यांनी दुःख व्यक्त करत त्यांना आदरांजली वाहिली आहे.

**राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू** यांनी येचुरी यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. विद्यार्थी राजकारण, राष्ट्रीय राजकारण आणि संसदेत येचुरी हे एक प्रभावी आवाज म्हणून कार्यरत होते. आपल्या विचारसरणीशी बांधिलकी असूनही त्यांचे सर्व पक्षांमध्ये मित्र होते, असं राष्ट्रपतींना म्हटलं आहे.

**येचुरी हे एक** अनुभवी नेते होते, विद्वत्ता आणि वक्तृत्वासाठी ते ओळखले जात अशी भावाना संरक्षण मंत्री **राजनाथ सिंह** यांनी व्यक्त केली आहे. तर येचुरी यांचं सार्वजनिक आयुष्यातलं योगदान कायम स्मरणात राहिल, असं केंद्रीय मंत्री **नितीन गडकरी** म्हणाले.

**सीताराम येचुरी** हे आयडीया ऑफ इंडियाचे संरक्षक होते, त्यांना देशाची सखोल समज होती, अशी भावना लोकसभेचे विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस नेते **राहुल गांधी** यांनी व्यक्त केली आहे.

येचुरी हे देशातल्या डाव्या पक्षांतील महत्वाचा आवाज होते, श्रमिक, कामगार आणि शेतकऱ्यांचा आवाज येचुरी यांच्या जाण्यानं हरपला आहे, असं ज्येष्ठ नेते **शरद पवार** यांनी म्हटलं आहे. येचुरी यांची पक्षनिष्ठा आणि विचारांशी असणारी बांधिलकी ही राजाकारणाच्या क्षेत्रात आदर्श बाब आहे, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली आहे.

**<><><><><>**

रायगड जिल्ह्यात धाटाव एमआयडीसीमध्ये असलेल्या एका रासायनिक कंपनीमध्ये आज सकाळी साडेअकराच्या सुमाराला झालेल्या स्फोटात ३ कामगारांचा मृत्यू झाला. स्फोट इतका शक्तिशाली होता की या परिसरात जवळपास एक किलोमीटरपर्यंत त्याचा आवाज पोहा◌ेचला. यामुळे भीतीचं वातावरण तयार झालं.

**<><><><><>**

जागतिक बाजारातल्या सकारात्मक वातावरणाचे पडसाद आज देशातल्या शेअर बाजारांमधे उमटले आणि बाजार नव्या उच्चांकावर बंद झाले. मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्सनं एक हजार ४३९ अंकांची झेप घेतली आणि तो दिवसअखेर ८२ हजार ९६२ या विक्रमी पातळीवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी ४७० अंकाची वाढ नोंदवत २५ हजार ३८८ या उच्चांकावर बंद झाला. धातू, दूरसंचार आणि तंत्रज्ञान क्षेत्रातल्या कंपन्यांचे समभाग तेजीत राहिले.

**<><><><><>**

चीनच्या हुलनबुइर इथं सुरु असलेल्या आशियाई पुरूष हॉकी स्पर्धेत आज भारतानं दक्षिण कोरियाला नमवत सलग चौथा विजय नोंदवला जिंकले. भारतानं दक्षिण कोरियाचा ३-१ अशा गोलफरकानं पराभव केला. अराईजीत सिंग हुंदाल आणि कर्णधार हरमनप्रीत सिंगच्या यांनी भारतासाठी गोल केले.

काल मलेशियाचा ८-१ असा दणदणीत पराभव करत, याआधीच भारत उपांत्य फेरीत दाखल झाला आहे. भारतीय संघ सध्या गुणतालिकेत अव्वल स्थानी आहे. गुणतालिकेतले पहिले चार संघ १६ सप्टेंबरला उपांत्य सामने खेळतील, तर अंतिम सामना १७ तारखेला होईल. भारतानं या स्पर्धेचं जेतेपद चारवेळा मिळवलं आहे.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसांत कोकणात बहुतांश ठिकाणी, मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी तर मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

**//<><><><><>//**